देवतांची उपासना : खंड ७

# पंढरीचा पहिला वारकरी (पांडुरंग)

## (पांडुरंगाचे माहात्म्य अन् पंढरीच्या वारीची वैशिष्ट्ये यांसह)

मराठी (Marathi)


**संकलक**

**परात्पर गुरु (कै.) परशराम माधव पांडे**

('संतपद' वा 'गुरुपद' म्हणजे ७० टक्के, 'सद्गुरुपद' म्हणजे ८० टक्के, 'परात्पर गुरुपद' म्हणजे ९० टक्के, तर 'ईश्वर' म्हणजे १०० टक्के आध्यात्मिक पातळी !)



**सनातन संस्था**


जानेवारी २०२२ पर्यंत सनातनच्या ३५० ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ८६ लाख ११ सहस्र प्रती !

## विषयसूची


卐 परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज यांचा परिचय ६

卐 ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचा सुरेख संगम असलेले एकमेवाद्वितीय परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज ! ९

卐 परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय ! ११

卐 परात्पर गुरु डॉ. आठवले हे पंढरीतील मौन स्वरूपातील पांडुरंगाचे प्रगटलेले सगुण स्वरूपच ! १३

卐 मनोगत १९

卐 ग्रंथाविषयीचे अभिप्राय २१


## ग्रंथाची अनुक्रमणिका


१. पंढरपूरचे स्थानमाहात्म्य २६

२. पांडुरंगाचा प्रिय भक्त पुंडलिक ! २८

३. पांडुरंग माहात्म्य ! ३३

४. 'पांडुरंगाष्टकम्' - श्रीमद् आद्य शंकराचार्यविरचित विठ्ठलस्तवन ३७

५. संतांनी केलेले पांडुरंगाचे वर्णन ५१

६. पांडुरंगभक्ती ५३

७. पांडुरंग हाच पंढरीचा 'पहिला वारकरी' ! ५५

८. एकादशीचे माहात्म्य ६१

९. वारीचा आरंभ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये ६३

१०. पांडुरंगाच्या ओढीने वारीत आनंदाने वाटचाल करणारे वारकरी ! ६९

११. सांकेतिक रेखाकृती असलेल्या वारकऱ्याचे चित्र आणि त्याचे विश्लेषण ७३

१२. स्वतःच्या लीलेतून भक्तांना ब्रह्मानंदाची अनुभूती देणारा भगवंत ! ७९

१३. भक्तांचा भगवंताविषयीचा अपार श्रद्धाभाव ८०

१४. सांप्रतकालीन समाजाची विदारक परिस्थिती ८०

१५. परिस्थितीत पालट होण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी केलेल्या प्रार्थनेप्रमाणे पांडुरंग पंढरीत उभा असणे ८२

१६. परात्पर गुरु डॉ. आठवले हे त्या पांडुरंगाचेच सगुण रूप असणे ! ८२


१७. निर्गुण आणि सगुण पांडुरंगांच्या चरणी कृतज्ञता ! ८३

卐 परिशिष्ट १ : भक्तांनो, पांडुरंगाची अधिकाधिक कृपा होण्यासाठी व्यष्टी साधनेसह समष्टी साधनाही करा ! ८४

卐 परिशिष्ट २ : प्रस्तुत ग्रंथाच्या संदर्भातील सेवा करतांना साधकांना शिकायला मिळालेली सूत्रे आणि आलेल्या अनुभूती ८८


‘प्रस्तुत ग्रंथाचा मूळ उद्देश ‘विठ्ठलाची महती सांगून जनमानसात विठ्ठलाची भक्ती रुजवणे’, हा आहे. ग्रंथाचे संकलक परात्पर गुरु पांडे महाराज यांनी या ग्रंथात परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचा उल्लेख ‘श्रीविष्णूचा किंवा विठ्ठलाचा अवतार’, तसेच ‘अवतारी पुरुष’ असा केला आहे. हे लिखाण ग्रंथात अंतर्भूत करण्यामागे अभ्यासात्मक उद्देश असून ‘परात्पर गुरु डॉ. आठवले यांना अवतार म्हणून घोषित करून कोणाला फसवणे किंवा ठकवणे, असा नाही’, तर ‘पृथ्वीवर जन्म घेऊनसुद्धा आपण आध्यात्मिक गुण कसे आत्मसात करून घेऊ शकतो ?’, हे कळावे, हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. साधना ही मनातील भावावर अवलंबून असते; म्हणूनच अध्यात्मात ‘भाव तेथे देव’, असे म्हटले जाते. ‘परात्पर गुरु डॉ. आठवले हे अवतार आहेत’, असा परात्पर गुरु पांडे महाराज यांचा भाव आहे. या भावापोटी त्यांनी ग्रंथात तसा उल्लेख केला आहे. हा त्यांच्या वैयक्तिक श्रद्धेचा आणि भावाचा भाग आहे. या ग्रंथाचे लिखाण आणि प्रकाशन करण्यामागील मूळ हेतू केवळ ‘जनमानसात विठ्ठलाची भक्ती रुजवणे’, हाच आहे, याची कृपया नोंद घ्यावी.’ – **प्रकाशक**

# परात्पर गुरु परशराम पांडे महाराज यांचा परिचय



## १. लौकिक जीवन

परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज यांचा जन्म लोहारी-सावंगा (जिल्हा नागपूर) येथे मार्गशीर्ष प्रतिपदा (२४.११.१९२७) या दिवशी झाला. त्यांचे आई-वडील धार्मिक वृत्तीचे होते. वडिलांनी बरीच वर्षे महामृत्युंजय जपाची साधना केली. त्यांनी वर्ष १९७० मध्ये त्यांच्या मृत्यूच्या दिवशी पहाटे शुचिर्भूत होऊन जप करतच देह ठेवला. तेही संतच होते. परात्पर गुरु पांडे महाराज यांच्या (६४ प्रतिशत आध्यात्मिक स्तर असलेल्या) पत्नी सौ. आशा पांडे यांनी त्यांना संसारात मोलाची साथ दिली. त्यांचा २२.८.२०१६ या दिवशी देहांत झाला.

## २. शिक्षण

परात्पर गुरु महाराजांनी जुन्या ११ वी नंतर १९५० मध्ये नागपूर येथील शासकीय अभियांत्रिकी विद्यालयातून 'सब ओव्हरसिअर' हा अभ्यासक्रम (कोर्स) पूर्ण केला. प्रकृती अस्वास्थ्य आणि आर्थिक अडचणी यांमुळे त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. याविषयी 'या अडचणी साधनेच्या दृष्टीने आवश्यक असल्याने ईश्वरानेच तसे घडवले. यामुळेच मला साधना करायला वेळ मिळाला', असे ते कृतज्ञतापूर्वक सांगत.

## ३. चाकरी

१९५६ मध्ये 'सब इंजिनिअर' म्हणून कार्य सांभाळत त्यांनी १९६८ मध्ये 'डेप्युटी इंजिनिअर' (एस्.डी.ओ.) पदापर्यंत प्रगती केली. मध्यंतरी एक मास त्यांनी कार्यकारी अभियंता म्हणून पदभार सांभाळला आणि ते डिसेंबर १९८५ मध्ये सेवानिवृत्त झाले. शासकीय चाकरी करतांना त्यांना अनेक बऱ्या-वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागले; परंतु नेहमी सत्याने आणि प्रामाणिकपणे वागल्यामुळे ईश्वरानेच त्या कठीण प्रसंगांतून त्यांना सुखरूप बाहेर काढले.

'उलट अशा त्रासांमुळे माझा नामस्मरणाचा वेग आणि ईश्वराशी अनुसंधान वाढले', असे ते सांगत.

## ४. गुरुप्राप्ती

वर्ष १९६० मध्ये ते नागपूर येथील प.पू. बापूराव महाराज खातखेडकर यांच्या संपर्कात आले आणि १९६७ मध्ये त्यांनी त्यांच्याकडून गुरुदीक्षा घेतली.

## ५. अध्यात्माची आवड आणि ज्ञानसंपदा

बालपणापासूनच त्यांना नामस्मरणाची आवड होती. बालपणीच त्यांनी श्रीमद्‌भगवत्‌गीता, दासबोध आणि इतर असंख्य तत्त्वज्ञानयुक्त धार्मिक ग्रंथांचे वाचन केले होते.

**५ अ. अनेक ग्रंथ संग्रही असून ज्ञान मुखोद्‌गत असणे :** महाराजांचा वेद, पुराणे, उपनिषदे, भागवत्, श्रीमद्‌भगवत्‌गीता, श्रीकृष्णावरील अनेक ग्रंथ, कल्याण उपासना अंक, आयुर्वेद आणि अन्य असंख्य विषयांचा प्रचंड अभ्यास असून ते जणू त्यांना मुखोद्‌गतच होते. असा कोणताच विषय नाही की, ज्यावर महाराज भाष्य करू शकत नव्हते. त्यांच्याकडे १ सहस्र २०० हून अधिक ग्रंथांचा संग्रह होता.

**५ आ. 'श्रीगणेश अध्यात्म दर्शन' ग्रंथाची निर्मिती :** १९७४ मध्ये एकदा त्यांचा मुलगा चि. अमोल याला अंकांची ओळख करून देत असतांना त्यांना ज्ञानेश्वरीतील 'वर्णवपु' श्रीगणेशाची आठवण झाली. पुढे या वर्णवपु गणेशामध्येच '0 ते ९' अंक, 'अ ते ज्ञ' हे वर्ण, 'ॐ', 'ऱ्हीं', 'श्री', 'स्वस्तिक', 'क्लीम्' हे सर्व बीजमंत्र साकारले गेल्याचे त्यांना आढळले. त्यांनी याविषयी अधिक संशोधन केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश येथे बऱ्याच ठिकाणी प्रवचनेही केली. यातूनच त्यांच्याकडून 'श्रीगणेश अध्यात्म दर्शन' या ग्रंथाची निर्मिती झाली. या ग्रंथाला २००५ मध्ये 'सर्वोत्कृष्ट आध्यात्मिक ग्रंथ' हा पुरस्कार मिळाला. 'परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कृपेमुळे हा पुरस्कार मिळाला', अशी त्यांची श्रद्धा होती.

**५ इ. अन्य ग्रंथांचे लिखाण :** परात्पर गुरु पांडे महाराज यांनी ‘जीवन सागरातील मोती’, ‘दिशा चक्र’, ‘ऋतु चक्र’, ‘त्रिसुपर्ण, तसेच ‘कलियुग खत्म – सत्ययुग लग गया’ या हिंदी ग्रंथाचा मराठी अनुवाद असलेले ‘युगपरिवर्तन अर्थात् कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा आरंभ’ या ग्रंथांचे लिखाण केले आहे. त्यांनी ‘भगवद्ध्वज’ या विषयावरील ग्रंथाच्या लिखाणाशी संबंधित सर्व साहित्य एकत्र केले आहे. त्यांची ‘आत्मवृत्त’ लिखाणाची सिद्धताही चालू होती.

## ६. परात्पर गुरु महाराजांचा कलेविषयीचा छंद

महाराजांना विशिष्ट आकाराचे दगड गोळा करण्याचा छंद होता. त्यांनी आतापर्यंत गणेश, देव-देवता, पशू, पक्षी, मानव, वनस्पती, ॐकार इत्यादी विविध आकारांचे ६०० पेक्षा अधिक दगड आणि गोटे गोळा केले होते.

## ७. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी परात्पर गुरु पांडे महाराज यांचा ‘संत’ म्हणून गौरव करणे

१८.२.२००५ या दिवशी परात्पर गुरु डॉक्टरांनी त्यांचा शाल, श्रीफळ आणि गुरुकृपायोगाचे सुवर्णपदक देऊन सत्कार केला होता अन् त्यांच्या संतत्वाची ओळख सर्वांना करून दिली होती. तेव्हापासून परात्पर गुरु पांडे महाराज सनातनशी सर्वार्थाने जोडले गेले आणि पुढे ते ‘परात्पर गुरु’ पदापर्यंत पोचले.

## ८. परात्पर गुरु पांडे महाराज यांचा देहत्याग


परात्पर गुरु पांडे महाराज यांनी वयाच्या ९२ व्या वर्षी रविवार, माघ कृष्ण पक्ष द्वादशी, कलियुग वर्ष ५१२० (म्हणजेच ३ मार्च २०१९) या दिवशी सायंकाळी ५ वाजून २२ मिनिटांनी सनातनच्या पनवेल येथील देवद आश्रमात देहत्याग केला. F (SStPanM + PR 12V-Vark) (2.2.2019)

> ‘परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्यावर आलेले मोठे मृत्यूसंकटरूपी गंडांतर परात्पर गुरु पांडे महाराज यांनी स्वतःवर घेतले.’ – **मयन महर्षि** (पू. [डॉ.] ॐ उलगनाथन् यांच्या माध्यमातून, ३.३.२०१९, सायंकाळी ६.२६)

विषयसूचीतील क्रमांक १

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय



१. आंतरराष्ट्रीय स्तराचे संमोहन-उपचारतज्ज्ञ (वर्ष १९७८ ते वर्ष १९९५)

२. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

३. गुरुकुलासम सनातन आश्रमांची निर्मिती !

४. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून ३१.१.२०२२ पर्यंत ११८ साधक संत झाले, तर १,१०५ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू.

५. देवता, साधना, आचारपालन, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती आणि ग्रंथ-प्रकाशन

६. ईश्वरप्राप्तीसाठी, तसेच राष्ट्र आणि धर्म यांच्या कार्यासाठी तन-मन-धन यांचा त्याग करणारे सहस्रो साधक घडवणे

७. साधना आणि हिंदु धर्म शिकवणाऱ्या ध्वनी-चकत्या (ऑडिओ सीडी) आणि ध्वनीचित्र-चकत्या (व्हिडिओ सीडी) यांची निर्मिती

८. वाईट शक्तींच्या संदर्भातील संशोधन आणि शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

९. स्वतःचा देह, तसेच वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

१०. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

११. ‘ईश्‍वरप्राप्तीसाठी कला’ व कलेचे सात्त्विक सादरीकरण यांविषयी संशोधन

१२. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्य असलेल्या सहस्रो वस्तूंचे जतन

१३. ३१.१.२०२२ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २४४ अन् अन्य ९०८ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

१४. ज्योतिषशास्त्र आणि नाडीभविष्य यांच्याद्वारे विविधांगी संशोधन

१५. प्रखर हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

१६. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्‍वरी राज्याच्या) स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

१७. भीषण आपत्काळाचा विचार द्रष्टेपणाने अनेक वर्षे आधीच करून आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदींद्वारे मार्गदर्शन

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ग्रंथ ‘परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या सर्वांगीण कार्याचा संक्षिप्त परिचय’ अन् पहा – ‘www.Sanatan.org’.)**

## परात्पर गुरु डॉक्टरांचा ईश्‍वराप्रतीचा कृतज्ञताभाव !

‘संत रहीम यांचे ‘एकै साधे सब सधै ।’, म्हणजे ‘एक साध्य केल्यावर सर्व साध्य होते’, हे सुवचन मी प्रतिदिन अनुभवतो. माझ्या संदर्भात ‘एक साध्य’, म्हणजे ‘ईश्‍वराचा आशीर्वाद’ आणि ‘सर्व साध्य’, म्हणजे विविध विषयांच्या अंतर्गत सेवा करता येणे; म्हणजे चित्रकला, संगीत, नृत्य, मूर्तीकला, अध्यात्मशास्त्रीय संशोधन इत्यादी अनेक विषयांची काहीही माहिती नसतांना त्या संदर्भात मी साधकांना मार्गदर्शन करू शकतो. मी साधना करत असल्याने मला ईश्‍वराचा आशीर्वाद मिळतो आणि तोच मला योग्य ते सुचवतो. यासाठी मी ईश्‍वरचरणी अनंत कोटी कृतज्ञ आहे.’
**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले**

## मनोगत

'पुंडलिका भेटी । परब्रह्म आले गा ।।' या संतवचनानुसार पांडुरंग भक्तराज पुंडलिकाच्या भेटीसाठी पंढरीला आला आणि त्याच्या विनंतीवरून तेव्हापासून तो भक्तांच्या कल्याणासाठी पंढरपूर येथेच भक्तांची वाट पहात उभा आहे. पांडुरंग हा पंढरीला जाणारा 'प्रथम वारकरी' आहे. वारकऱ्यांसाठी आदर्शवत असलेला पांडुरंग अठ्ठावीस युगांपासून केवळ भक्तांच्या कल्याणार्थ दोन्ही हात कमरेवर ठेवून (समत्वभावाने) विटेवर द्वैतात उभा आहे. भावाच्या भुकेल्या पांडुरंगाला भक्ताच्या भेटीची अतीव ओढ असून त्याच्या भेटीने तो प्रसन्न होतो आणि त्याला कल्याणरूपी कृपाशीर्वाद देतो.

भक्तांच्या (साधकांच्या) कल्याणासाठी तळमळणारा हा पांडुरंग कलियुगात सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या रूपात आज आपल्याला लाभलेला आहे, हे आपले अहोभाग्य आहे.

पांडुरंग 'भक्त (शिष्य) कसा असावा ?' याचा आदर्श आहे; म्हणूनच या पुस्तकाला 'पंढरीचा वारकरी' असे नाव दिले आहे. यात 'वारकरी म्हणजे स्वतः पांडुरंग आहे', हे अध्याहृत आहे.

सहस्रो वर्षे विविध युगांमध्ये विविध प्रकारे साधना करूनही मनुष्याला भगवत्प्राप्ती होत नाही; परंतु या घोर कलियुगात स्वतः भगवंत (पांडुरंग) भक्तांसाठी तिष्ठत उभा असून भक्तांना आनंदाचे आस्वादन घेण्यासाठी बोलवत आहे, हे कलियुगातील साधकांसाठी वरदानच म्हणावे लागेल.

या ग्रंथात सांकेतिक रेखाकृती असलेल्या वारकऱ्याच्या चित्राद्वारे त्याची माहिती दिली आहे. मी 'श्री गणेश – अध्यात्म दर्शन' या ग्रंथात 'वर्णवपु श्री गणेश' (संत ज्ञानेश्वरांनी श्रीगणेशाला ज्ञानेश्वरीत संबोधल्याप्रमाणे) या प्रकरणात 'अंक, बीजमंत्र, स्वर आणि व्यंजने कशी अनुस्यूत आहेत', हे रेखाकृती काढून दर्शवले आहे आणि त्याद्वारे श्रीगणेशाचे आध्यात्मिक दृष्ट्या महत्त्व विशद केले आहे. त्या रेखाकृतीवरूनच मला वारकऱ्याच्या सांकेतिक रेखाकृतीची कल्पना सुचली.

भाविक वारकरी पंढरीला पांडुरंगाच्या दर्शनाला जातांना ‘९’ (नऊ) या अंकाप्रमाणे (जीव-भावाप्रमाणे) जात असतो; परंतु वारीतील (साधनेतील) सातत्य आणि आनंदावस्था यांमुळे त्याच्यात पालट होऊन तो ‘१’ (एक) या अंकाप्रमाणे आत्मस्वरूप होतो. त्याला आत्मानंदाचा प्रसाद मिळतो आणि शेवटी तो ब्रह्मस्वरूपात विलीन होतो. हे या ग्रंथात सांकेतिक रेखाकृतीने सुस्पष्ट केले आहे.

प्रस्तुत ग्रंथात पंढरी (पंढरपूर), पांडुरंग, भक्तशिरोमणी पुंडलिकाचे माहात्म्य, वारी आणि वारकरी यांचे आध्यात्मिक स्वरूपाचे वर्णन सविस्तरपणे केलेले आहे. या ग्रंथाच्या वाचनामुळे पंढरपूरला जाणारे वारकरी आणि इतर भाविक यांचा पांडुरंगाप्रती भक्तीभाव अन् त्याच्या भेटीची ओढ वाढणार आहे. त्यांना पंढरपूर, भक्तराज पुंडलिकाचे अपार भक्ती महात्म्य, वारीचे आध्यात्मिक महत्त्व यांचे आकलन होऊन त्यांची श्रद्धा वृद्धींगत होण्यास साहाय्य होणार आहे.

‘सर्व भाविकांनी पांडुरंगाप्रती आपली श्रद्धा वाढवून साधना करावी, अनुभूतीद्वारे भक्तीचा आस्वाद घेऊन आनंद घ्यावा आणि यातून आपली आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी’, हा प्रस्तुत ग्रंथलिखाणाचा उद्देश आहे. ‘विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।।’ या संत चोखामेळ्यांच्या भजनपंक्तीनुसार त्यांनी नामजपात रंगून भान हरपून पंढरीच्या भक्तीसागरात मनसोक्त डुंबावे. अंतर्बाह्य शुचिर्भूत व्हावे.

या ग्रंथाच्या वाचनाने ‘प्रत्येकाला पंढरीच्या वाटेवर वाटचाल करणाऱ्या दिंडीतील ‘एक तरी पाऊल अनुभवावे’, अशी ओढ लागून भक्तीची ही गंगा अशीच अखंड वहात रहावी व प्रत्येक जिवाची जलद आध्यात्मिक उन्नती व्हावी, हीच सदिच्छा !’ अशा या आनंदकंददात्या पांडुरंगाची महती वर्णन करण्याची ही अनमोल संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. यासाठी मी त्या आनंददात्या पांडुरंगाच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता व्यक्त करतो.’

**– (परात्पर गुरु) परशराम पांडे (महाराज)**